महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर**

**जि. लातूर - 413517.**

No. COFS/ Training/412 /2017 Date: 29/07/17

**परिपत्रक**

गोड्यापाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी चांगल्या प्रतीचे बीजाची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. मत्स्य बीजोत्पादन क्षेत्रामध्ये अधिकाधिक उद्योजक तयार व्हावेत या उद्देशाने मत्स्य विज्ञान महाविद्यालय उदगीर येथे **"गोड्यापाण्यातील मत्स्य बीजोत्पादन"** या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये महाविद्यालयांमधील तज्ञ प्राध्यापकांमार्फत मत्स्य बीजोत्पादनाची सद्यस्थिती, मत्स्य बीजाची ओळख, मत्स्य बीजोत्पादनाबाबत प्रात्यक्षिक, जल व्यवस्थापनबाबत प्रात्यक्षिक, मत्स्य बीजोत्पादनाचे अर्थशास्त्र, इत्यादी विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. याबरोबर कार्यक्रमा दरम्यान प्रक्षेत्र भेटीचे देखील आयोजन केले आहे. शेतकरी, युवक, उद्योजक, महिला बचत गट सदस्य, महाविद्यालयीन विद्यार्थी व अन्य इच्छुक नागरीक कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवू शकतात. प्रशिक्षणासाठी नोंदणी फी ५०० रुपये असून प्रवेश क्षमता २० प्रशिक्षणार्थी आहे. प्रशिक्षणाचा कालावधी आठ ते दहा ऑगस्ट २०१७ हा आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी मत्स्यविज्ञान महाविद्यालय, कवलखेड रोड, उदगीर येथे संपर्क करून नाव नोंदणी करावी.

अधिक माहितीसाठी ०२३८५-२५६६७२ किंवा ९८९०९१५६८६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

**सहयोगी अधिष्ठाता**
मत्स्य विज्ञान महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर ४१३५१७